केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत (MsDP) मान्यता प्राप्त परभणी जिल्ह्यातील परभणी शहर येथील मान्यता प्राप्त विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी राज्य हिश्यांतर्गत मंजूर उर्वरित अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१२/प्रक्र.२१९/का.०७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: - २८ /०३/२०१८

<u>संदर्भ</u>:

१. अवर सचिव, अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ३/१३(४) / २००८-PP- १, दि. ०७/०१/२०११.
२. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग,क्रमांक अविवि-२०१०/प्रक्र.४६/का.०७ दि.०८/०३/२०११
३. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक,अविवि-२०१२/प्रक्र.२२५/का.०७ दि.१७/०८/२०१३
४. शासन ज्ञापन, अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अविवि-२०१२/प्र.क्र.२१९/का.०७ दि.३/०७/२०१५
५. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक,अविवि-२०१२/प्रक्र.२१९/का.०७ दि.०३/०७/२०१५

प्रस्तावना :-

१२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाने बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) गठित शक्तीप्रदान समितीने दि.१७/०९/२०१० रोजीच्या ३८ व्या बैठकीत परभणी शहर, जि. परभणी येथे मुलींसाठी १०० प्रवेशक्षमतेचे १ वसतीगृह (विद्युतीकरणासह) बांधणे या योजनेकरीता एकूण रू.१५९.५४ लाख इतक्या रकमेच्या प्रस्तावास मान्यता दिली असल्याचे संदर्भाधिन क्र.(१) दि.७/०१/२०११ च्या पत्राव्दारे कळविले आहे. यासंदर्भात केंद्रशासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी, यांच्यामार्फत प्राप्त प्रस्तावांना अनुसरुन, संदर्भ क्रमांक (४) येथील शासन ज्ञापनाव्दारे परभणी शहर, जि. परभणी येथे मुलींसाठी १०० प्रवेशक्षमतेचे १ वसतीगृह इमारत बांधकामास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरहू प्रशासकिय मान्यतेस अनुसरुन संदर्भ क्र. (२) व (५) अन्वये केंद्र हिस्सा रू.१३३.७४ लाख तरतूद जिल्हाधिकारी, परभणी यांना मंजूर करुन पूर्णपणे वितरीत करण्यात आली आहे. या प्रयोजनांसाठी उर्वरित राज्य हिस्सा अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

परभणी येथे अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह इमारत बांधणे या कामासाठी राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून राज्य हिश्श्यातील मंजूर रू.२५.८० लाख पैकी रू.१०.०० लाख इतकी रक्कम तसेच मोकळ्या जागेस छतासाठी प्रोफलेक्स शिट बसविण्याचे प्रलंबित देयक अदा करण्यासाठी रू.१.७० लाख अशी एकूण रु.११.७० लाख इतकी रक्कम जिल्हाधिकारी परभणी यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र. (१०) प्रमाणे मंजूर करून वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे :-

(रू.लक्ष)

अ.क्र.	कामाचे नांव	एकूण कामे	कामाची किंमत	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण किंमत	वितरीत केंद्र हिस्सा	वितरीत राज्य हिस्सा	वितरीत करावयाचा राज्य हिस्सा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	परभणी येथे मुलींसाठी वसतीगृह इमारत बांधणे	०१	१५९.५४	१३३.७४	२५.८०	१५९.५४	१३३.७४	--	१०.००
२	वसतीगृहाच्या मोकळ्या जागेत छतासाठी फोफलेक्स शिट बसविणे	-	-	-	-	१.७०	-	-	१.७०
	एकूण		**१५९.५४**	**१३३.७४**	**२५.८०**	**१५९.५४**	**१३३.७४**	**-**	**११.७०**

४. उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.(१०) प्रमाणे सन २०१७-१८ या वर्षात बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत परभणी जिल्ह्यातील परभणी शहर येथील विकासकामांसाठी तसेच राज्य हिश्श्यातील रु.११.७० लाख (रूपये अकरा लाख सत्तर हजार मात्र) एवढी रक्कम जिल्हाधिकारी, परभणी यांना सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील तसेच या शासन निर्णयान्वये सदर मुलींच्या वसतीगृह इमारतीच्या मोकळया जागेत प्रोफेलेक्स शिट बसविणे या रू.१.७० लाख रकमेच्या कामास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. सन २०१७-१८ या वर्षात जिल्हाधिकारी, परभणी यांना उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.(१०) प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या एकूण रकमेच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून सदर रक्कम आहरित व संवितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, परभणी यांनी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत परभणी येथे मुलींसाठी वसतिगृह इमारत बांधकामासाठी या योजनेकरीता आहरित केलेली रक्कम संबंधित अमंलबजावणी यंत्रणेस रितसर वितरित करावी.

६. केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या दि.१६/०२/२०१५ रोजीच्या पत्रातील सूचनांनुसार बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमाअंतर्गत (MsDP) वितरीत करण्यात येणा-या निधीस VAT वा कोणत्याही प्रकारचे विभागीय कर लागू राहणार नाहीत.

७. सदरचा खर्च करण्यास वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C च्या मार्गदर्शक तत्वानुसार / CAG च्या निर्देशानुसार कोणताही शासन निर्णय / अटी व शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरित करण्यापूर्वी संबंधित जिल्हाधिकारी यानी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / कार्यालयीन आदेश / वित्तीय नियमावली /

सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यनियमावली / भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे निरिक्षण अहवाल / वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

८. अमंलबजावणी यंत्रणा यांनी विषयांकीत ०१ मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच त्रैमासिक अहवाल (QPR) विहित नमुन्यात (अद्ययावत छायाचित्रांसह) संबंधीत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर करावीत. तसेच विभागाच्या Construction tracker प्रणालीवर देखील विषयांकीत वसतीगृह बांधकामाची माहिती वेळोवेळी upload करावी.

९. जिल्हाधिकारी, परभणी यांनी विषयांकीत ०१ वसतीगृह, बांधकामासाठी निधी मागणीच्या प्रस्तावासोबत वरीलप्रमाणे विहित नमुन्यातील निधीच्या विनियोगाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच त्रैमासिक अहवाल (QPR) (अद्ययावत छायाचित्रांसह) शासनास सादर करावीत.

१०. सदर योजनेंतर्गत राज्य हिश्श्यावर होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना (०१) (१४) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, (राज्य हिस्सा) (२२३५-ए २३१) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

११. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७ अन्वये प्रशासनिक विभागांस प्रदान करण्यात आलेल्या अधिकांरानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१८०३२८१८४७४९५३१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.28 18:49:53 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व परीक्षा) मुंबई/नागपूर.
३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (बांधकामे), मंत्रालय, मुंबई
४. जिल्हाधिकारी, परभणी
५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.
६. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, परभणी.

८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परभणी.
१०. वित्त विभाग (अर्थसंकल्प -४/ व्यय -४) मंत्रालय, मुंबई.
११. नियोजन विभाग (कार्या.१४७५)
१२. निवड नस्ती, का.७.